ePaper
‘मुलींना शिक्षणासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करा’; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

॥ वर्ष - 8 । अंक - 58 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ बुधवार, दिनांक 04 सप्टेंबर 2024 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews




## आतील पानांत

- शहजादने पाकिस्तानची उडवली खिल्ली
- आझमने कसोटीमधून घेतली निवृत्ती?
- रुबिना दिलायक होणार आहे आई
- बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास फाशी

## विविध सर्वेक्षणांमध्ये शिवसेना आघाडीवर

# महायुतीत शिंदेच मोठे भाऊ?

### आघाडीशी सामना करताना एकनाथ शिंदे चेहरा?

। मुंबई । महाईन्यूज

**राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महाविकास आघाडीकडून कोणी नेतृत्व करावे याविषयी आघाडीचे नेते चाचपणी करीत असताना महायुतीमध्ये मात्र भाजप आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या तुलनेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा चेहरा आणि त्यांची शिवसेना दोन पावले पुढे असल्याची माहिती महायुतीमधील विविध सर्वेक्षणांमधून पुढे आल्याचे समजते. त्यामुळे साहजिकच महाविकास आघाडीचा सामना करताना रणनीतीचा भाग म्हणून भाजप आणि राष्ट्रवादीकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुढे करण्याबाबत गांभीर्याने विचार सुरू असल्याचे समजते.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नागपूर येथील शासकीय निवासस्थानी शनिवारी महायुतीच्या नेत्यांची एक बैठक पार पडली. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजित पवार उपस्थित होते. मध्यरात्रीपर्यंत चालेल्या या बैठकीत महायुतीमधील तिन्ही पक्षांसाठी जागांसंदर्भात केलेल्या सर्वेक्षणाची माहिती संबंधित कंपन्याच्या प्रतिनिधींनी सादर केली. यावेळी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून खा. प्रफुल्ल पटेल तसेच खा. सुनील तटकरे, भाजपकडून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तर शिवसेनेकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच उपस्थित होते. राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकांना सामोरे जाण्यापूर्वी या तिन्ही पक्षांनी त्यांच्या त्यांच्या परीने सर्वेक्षण केले असून त्याचे अहवाल या बैठकीत मांडून त्याबाबत चर्चा करण्यात आली. महाविकास आघाडीला तोंड देताना शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा मुकाबला करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काय रणनीती आखायला हवी, काँग्रेससोबत दोन हात करण्यासाठी विदर्भात काय खेळी खेळायला हवी याशिवाय मुंबई तसेच कोकणात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला दोन पावले मागे टाकण्यासाठी कसे जागावाटप करायला हवे, याबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. गेल्या काही महिन्यांपासून विशेषत: लोकसभा निवडणुकीपासून भाजपच्या विरोधात विरोधकांनी चांगलेच रान पेटवले असून त्यांनी भाजपला कसे अडचणीत आणले आहे, याची उदाहरणे यावेळी सादर करण्यात आली. लोकसभा निवडणुकीत मराठा आणि ओबीसी वाद पेटल्यानंतर भाजपचे कसे नुकसान झाले, याविषयीचा आढावा घेण्यात आला. अद्यापही या परिस्थितीत बदल झाला नसून त्याचा कसा आणि कितपत फटका बसेल, याबाबतचे भाष्यही अहवालाच्या माध्यमातून या बैठकीत करण्यात आल्याचे समजते. शरद पवार यांच्या तुलनेत अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष अद्याप पाहिजे तेवढा मजबूत झालेला नाही.

### ‘लाडकी बहीण’चा लाभ होणार?

भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या तुलनेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा चेहरा शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही ठिकाणी बऱ्यापैकी चालत असल्याची चर्चा या बैठकीत झाली. त्यामुळे विरोधकांचा सामना करताना शिंदे यांना कशा पद्धतीने पुढे करता येईल, त्याचा अपेक्षित परिणाम कसा साध्य करता येईल याविषयी चर्चा झाल्याचे समजते. राज्य सरकार मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा जोरदार प्रसार करीत असले तरी आणि या योजनेला प्रतिसादही जोरदार मिळत असला तरीही मतदानात लाभ होईल की नाही याविषयी साशंकता व्यक्त करण्यात आल्याचे समजते. या योजनेसाठी पुढच्या महिनाभरात सरकारला मेहनत घ्यावी लागणार असल्याचे सुचविण्यात आल्याचेही समजते.

## सशक्त, सुसंस्कृत जबाबदार युथ घडवण्याचा संकल्प!

### शहरातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये उपक्रम; महेशदादा एजुकेशनल फॉउंडेशनचा पुढाकार

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।




सुसंकृत पिढी घडविण्यासाठी त्यांचा पाया म्हणून विद्यार्थांना स्पर्धा परीक्षेचे शिक्षण पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व माध्यमांचा शाळांमध्ये सुमारे १ लाख पेक्षा जास्त विद्यार्थ्यांसाठी “चला महाराष्ट्र घडवूया” हा क्रांतिकारी शैक्षणिक उपक्रम राबवला जात आहेपिंपरी-चिंचवडमधील महेशदादा एजुकेशनल फॉउंडेशन, एक घास फॉउंडेशन व आयआयबी करियर इन्स्टिट्युट यांचा संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जात आहे. हा उपक्रम देश पातळीवर तसेच महाराष्ट्रमध्ये सर्व प्रथमच होत आहे. या उपक्रमा अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरामध्ये सर्व माध्यमाच्या शाळामध्ये UPSC/ MPSC : IAS/ IPS/ IRS / IFS , NEET / JEE / MHT-CET, NDA, CA, Banking, Rail-ways, CLAT न्यायाधीश सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी इयत्ता ५ वी / ७ वी पासूनच आणि तेही निःशुल्क / मोफत उपलब्ध होणार आहे. आदर्श व संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी शैक्षणिक शिक्षणासोबत संस्कार वर्ग, मेडिटेशन कॅम्प सुद्धा घेतले जाणार आहेत. या अनुषंगाने या उपक्रमाची माहिती सर्व शाळेचा प्राचार्यांना देण्यासाठी बुधवारी दि. ४ सप्टेंबर २०२४ रोजी १२ वाजता शिबीराचे आयोजन आयआयबी करिअर इन्स्टिटयूट, मोरवाडी येथे आयोजन करण्यात आहे.

### जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांपर्यंत उपक्रम पोहोचवण्याचा संकल्प...

महेशदादा एजुकेशनल फॉउंडेशनचे अध्यक्ष आमदार महेश लांडगे, आयआयबी करिअर इन्स्टिटयूटचे संचालक ॲड. महेश लोहारे, तसेच एक घास फॉउंडेशनचे अध्यक्ष प्रा. शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे आयोजन केले आले असून, शहरातील सर्व माध्यमाच्या शाळांच्या संस्थापक / अध्यक्ष, प्राचार्य, कॉ- ऑर्डीनटोर यांना या क्रांतिकारी शैक्षणिक उपक्रमामध्ये सहभागी होऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यानं पर्यंत हा क्रांतिकारी शैक्षणिक उपक्रम पोहचवावा. तसेच, इच्छुक शाळांनी रजिस्ट्रेशनसाठी ७४९९५६७४४५ / ८०५५७३०८४५ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन केले आहे.

# राज्यात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान!

## नुकसानीचा सर्वाधिक फटका विदर्भाला बसला

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे १.७० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानीचा सर्वाधिक फटका विदर्भाला बसला आहे. एक आणि दोन सप्टेंबर रोजी मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती संकलित करण्याचे काम कृषी विभागाकडून अद्याप सुरू आहे.**



विभागातून मिळालेल्या माहितीनुसार, जुलै महिन्यात राज्यातील ३६ पैकी २५ जिल्ह्यांना कमी-जास्त प्रमाणात अतिवृष्टीचा फटका बसला. नुकसानीचे प्रमाण विदर्भात जास्त होते. विदर्भात सुमारे ९७ हजार ६५२ हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहेत. बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यांना फटका बसला. त्या खालोखाल मराठवाड्यातील हिंगोली, परभणी आणि कोल्हापूर जिल्ह्यात मोठे नुकसान झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात जूनमध्ये पावसाने ओढ दिली होती. जुलैमध्ये मुसळधार पाऊस पडून पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे कोल्हापूरमध्ये भात, ऊस, सोयाबीन, नाचणी, भुईमूग आणि भाजीपाला पिकांचे नुकसान झाले होते. जुलै महिन्याच्या तुलनेत ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टीमुळे नुकसान कमी झाले आहे. ऑगस्ट महिन्यात २०३३२.७९ हेक्टरवरील पिकाचे नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यात विदर्भाला अतिवृष्टीचा फटका बसला. अमरावतीत सर्वाधिक १८२७९ हेक्टरवरील सोयाबीन, कापूस, तूर, मका या पिकांना फटका बसला. त्या खालोखाल बुलडाणा जिल्ह्यातील चिखली, मेहकर तालुक्यांत सोयाबीन पिकाचे हुमणी अळीमुळे मोठे नुकसान झाले. दोन तालुक्यात ८८९ हेक्टरवर सोयाबीनचे पीक उद्ध्वस्त झाले.राज्यात यंदाच्या खरिपात ऊस वगळून सरासरी १,४३,२१,४३९ हेक्टरवर पेरणी होते. यापैकी सोयाबीनची पेरणी ५०,५२,५३३ हेक्टरवर झाली आहे. सोयाबीनचे चांगले उत्पादन निघून चांगले पैसे होणे अपेक्षित असतानाच जुलै, ऑगस्टमधील पावसाने राज्याच्या सर्वच भागातील सोयाबीनचे नुकसान झाले आहे. जुलै, ऑगस्ट हा काळ सोयाबीनच्या शेंगा भरण्याचा काळ असतो. नेमक्या याच काळात अतिवृष्टी, संततधार पावसामुळे पिके पाण्यात बुडून पिवळी पडून नुकसान झाले. सप्टेंबरच्या एक, दोन तारखेला मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीत पुन्हा सोयाबीनचे प्रचंड नुकसान झाले आहे. आता सोयाबीनची काढणी सुरू आहे. या काळात पावसाने उघडीप न दिल्यास नुकसानीचा आकडा आणखी वाढू शकतो. कृषी विभागातून मिळालेल्या माहितीनुसार, जुलै महिन्यात राज्यातील ३६ पैकी २५ जिल्ह्यांना कमी-जास्त प्रमाणात अतिवृष्टीचा फटका बसला. नुकसानीचे प्रमाण विदर्भात जास्त होते. विदर्भात सुमारे ९७ हजार ६५२ हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहेत. बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यांना फटका बसला. त्या खालोखाल मराठवाड्यातील हिंगोली, परभणी आणि कोल्हापूर जिल्ह्यात मोठे नुकसान झाले

### पिकाचे हुमणी अळीमुळे नुकसान

आहे. कोल्हापूर जिल्ह्यात जूनमध्ये पावसाने ओढ दिली होती. जुलैमध्ये मुसळधार पाऊस पडून पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे कोल्हापूरमध्ये भात, ऊस, सोयाबीन, नाचणी, भुईमूग आणि भाजीपाला पिकांचे नुकसान झाले होते.ऑगस्ट महिन्यात २०३३२.७९ हेक्टरवरील पिकाचे नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यात विदर्भाला अतिवृष्टीचा फटका बसला. अमरावतीत सर्वाधिक १८२७९ हेक्टरवरील सोयाबीन, कापूस, तूर, मका या पिकांना फटका बसला. त्या खालोखाल बुलडाणा जिल्ह्यातील चिखली, मेहकर तालुक्यांत सोयाबीन पिकाचे हुमणी अळीमुळे मोठे नुकसान झाले.

# सततच्या पावसाने भाजीपाला महागला

## पावसाने मेथी, पालक, शेपू, कोथिंबीर, मिरची महाग

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**संततधार पावसामुळे आता शेतमालाचे मोठे नुकसान होत असल्याचे समोर येत असून, यामुळे बाजारात सध्या चाकवत, पोकळा, तांदळी अशा भाज्या दिसेनाशा झाल्या आहेत, तर मेथी, पालक, शेपू, कोथिंबीर यांच्या जुड्यांचे दर पन्नास रुपयांच्या घरात गेले आहेत.**



मिरची, घेवडा, वाघ्या घेवड्याचे दर १२० रुपये किलोच्या घरात गेले आहेत. ऑगस्ट महिन्यात सलग मुसळधार पाऊस झाल्याने चालू हंगामात तयार होत आलेल्या भाजीपाल्याचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी अतिवृष्टीने शेतातील तयार भाजीपाला सडून गेला आहे. विशेषत: पालेभाज्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचून राहिल्याने चाकवत, पोकळा, तांदळीसारख्या भाज्या खराब झाल्या आहेत. यामुळे गेल्या आठवडाभरापासून बाजारात भाजीपाल्याची होणारी आवक एकदम घसरली आहे. सातार्‍यातील बाजारपेठेत गेले काही दिवस चाकवत, पोकळा, तांदळी अशा पालेभाज्या तर दिसेनाशा झाल्या आहेत. टोमॅटो, मिरची, घेवडा पावसामुळे खराब झाल्या असून, त्यांचा दर्जा खालावलेला दिसत आहे. मेथी, पालक, शेपू, कोथिंबिरीची आवकही कमी होत आहे. चांगल्या प्रतीचा भाजीपाला कमी येत असून, त्यासाठी जास्त किंमत मोजावी लागत आहे.

### हिरवी मिरची 40 रुपये पावशेर

सध्या पालेभाज्यांमध्ये मेथीची जुडी पन्नास रुपये, शेपू चाळीस रुपये, पालक तीस रुपये, तर कोथिंबिरीचा दर जुडीला साठ ते शंभर रुपये झाला आहे. जेवणात महत्त्वाच्या असणार्‍या पालेभाजांची आवक घटल्याने त्या महाग झाल्या आहेत. आमटीला चव आणणार्‍या कोथिंबिरीची आवक कमी झाल्याने मंडईत चार-पाच काड्यांच्या वाट्याला चक्क वीस रुपये मोजावे लागत आहेत. मोठ्या आकाराच्या जुडीचा दर शंभरावर पोहोचला आहे. फळभाज्यांचे दरही वाढले आहेत. घेवडा २० रुपये, तर वाघ्या घेवडा ३० रुपये पावशेर दराने विकला जात आहे. हिरवी मिरची ४० रुपये पावशेर अशी मिळत आहे. गेल्या महिन्यात सलग तीन आठवडे पाऊस पडत होता.


## महाराजांच्या पुतळ्यावरुन राजकीय षडयंत्राचा आणखी एक प्रयत्न फसला

# संभाजी महाराज पुतळा प्रकरणात आता 'नोटीस ड्रामा'!

### "महानगरपालिका आयुक्त तोंडघशी पडले" वृत्तांमध्ये तथ्य आहे का?

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**धर्मवीर संभाजी महाराज पुतळा प्रकरणात 'पॉलिटिकल मायलेज' मिळत नाही. ही बाब लक्षात आल्यानंतर महाविकास आघाडीचे 'बॅनर' पुढे करुन "आय एम अलवेज राईट" अशी भूमिका घेणारे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांचा आणखी एक प्रयत्न फसला आहे.**




. "छत्रपतींच्या पुतळ्याच्या अवशेषाला तडा गेला, कार्यकारी अभियंत्याची कबुली, महानगरपालिका आयुक्त तोंडघशी पडले, प्रशासनाने हात झटकले, पुतळा उभारणीमध्ये हलगर्जीपणा झाला. संबंधित ठेकेदार आणि सल्लागाराला नोटीस बजावली, प्रशासनाने माहिती दडवली.. लपवाछपवी" अशा आशयाचे वृत्त शहरातील आघाडीच्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले. विशेष म्हणजे, महानगरपालिका कार्यकारी अभियंता श्री. देवन्ना गट्टूवार यांच्या प्रतिक्रियेसह खणखणीत बातमी प्रसिद्ध झाल्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांच्या मनात संशय निर्माण झाला.

याबाबत पिंपरी-चिंचवडमधील शिव-शंभूप्रेमी आणि सर्वसामान्य नागरिकांना खरी वस्तुस्थिती ज्ञात व्हावी. या करिता 'महाईन्यूज'च्या माध्यमातून आम्ही FACT CHECK केले.

वरील सर्व बाबींचा विचार केला असता, शहरातील काही पत्रकार सहकाऱ्यांना कोणीतरी चुकीची माहिती दिली असावी. त्यामुळे अपूर्ण माहितीच्या आधारे वृत्त प्रसिद्ध केल्याचे लक्षात येते.

### महापालिका अधिकारी दबावाखाली...?

वास्तविक, दि.३० ऑगस्ट रोजी एक वृत्त प्रसारमाध्यमांत प्रसिद्धीस आले. त्यानंतर प्रकरणाचे गांभीर्य ओळखून महापालिका आयुक्तांनी लगेच सायंकाळी प्रसिद्धी पत्रक काढले आणि व्हीडिओद्वारे पिंपरी-चिंचवडकरांशी संवाद साधला. विशेष म्हणजे, "चुकीच्या बातमीवर विश्वास ठेवू नका" असे आवाहनही केले. पुतळ्याच्या उभारणीबाबत भारतीय सनदी सेवेतील अधिकारी (IAS) आणि B.Tech(Civil Engg) M.Tech(Structural Engg) असे उच्चविद्याविभूषित असलेले शहराचे प्रशासकीय प्रमुख शेखर सिंह यांच्यावर भाजपाचे प्रवक्ते आहेत का? असा आरोप तुषार कामठे यांनी उपस्थित केला होता. दुसरीकडे, महापालिकेतील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर माहितीसाठी दबाव टाकला जात आहे. त्यासाठी काही स्थानिक नेते फोन करीत आहेत. किंबहुना, महाविकास आघाडीतील बड्या नेत्याचा निरोप आहे माहिती द्या... असा दबाव महापालिकेत निर्माण केला जात आहे, अशी चर्चाही महानगरपालिका वर्तुळात ऐकायला मिळते. मात्र, याबाबतच्या तथ्याबाबत 'महाईन्यूज' कोणतीही पुष्टी करत नाही.

### पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या अधिकृत माहितीनुसार

1. छत्रपती संभाजी महाराज पुतळा मोजडीला कथित तडा गेल्या प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाने संबंधित ठेकेदार आणि सल्लागार यांना कोणतीही नोटीस बजावलेली नाही.

2. कार्यकारी अभियंता श्री. देवन्ना गट्टूवार यांनी पुतळ्याला तडा गेल्याबाबत पत्रकार प्रतिनिधींकडे कबुली प्रतिक्रिया दिली आहे, या वृत्तामध्येही तथ्य नाही.

3. आघाडीच्या वृत्तपत्रांमध्ये केवळ शब्द फिरवून एकाच आशयाचे वृत्त प्रसिद्ध झाले. त्यामध्ये पुतळ्याला तडा गेल्याचे म्हटले आहे. यामध्येसुद्धा तथ्य नाही. पुतळ्याचे काम सध्या Fabrication stage मध्ये आहे.

4. महानगरपालिका प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला पत्राद्वारे " दि.३० ऑगस्ट २०२४ रोजी काही व्यक्तींनी पुतळ्याच्या काही भागाचे फोटो व्हायरल करुन सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तरी यापुढे असल्या घटना घडू नयेत यासाठी आपणामार्फत पुतळ्याचे भाग साईटवर सुस्थितीत तसेच आच्छादित करुन ठेवणेत यावेत. तसेच, संपूर्ण परिसर बंदिस्त करुन इकडिल विभागाचे परवानगी शिवाय कोणासही प्रवेश देणेत येवू नये. " असे कळवले आहे. याला कायदेशीर भाषेत नोटीस म्हणत नाहीत.

किंबहुना, इतक्या संवेदनशील विषयाबाबत वृत्तांकनाला प्रसिद्धी निश्चित करताना वरिष्ठांनीही वृत्ताबाबत शहानिशा केल्याचे दिसत नाही.

मालवण येथील पुतळा प्रकरणामध्ये राज्यभरात जनक्षोभ निर्माण झाला. त्याची पुनरावृत्ती पिंपरी-चिंचवडमध्ये होवू नये. या करिता समाजाचा 'आरसा' असलेल्या पत्रकार, प्रसारमाध्यमकर्मींनी पुढाकार घेतला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे.

---

## पीसीएमसी स्मार्ट सारथी प्रकल्प राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

### ई-प्रशासन: महापालिकेच्या प्रकल्प ठरतोय देशासाठी रोल मॉडेल

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पीसीएमसी स्मार्ट सारथी प्रकल्पाला केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार निवारण विभागाच्या वतीने 'ई-गव्हर्नन्स स्कीम २०२३-२४' अंतर्गत डिस्ट्रीक्ट लेव्हल इनिशिएटीव्ह्ज इन ई-गव्हर्नन्स'(ई-प्रशासनामध्ये जिल्हास्तरीय उपक्रम) या श्रेणीमध्ये सिल्व्हर अवॉर्ड (द्वितीय क्रमांक) या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हा पुरस्कार स्वीकारला. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख पाच लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.**



यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, माहिती तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे आणि फॉक्सबेरी टेक्नोलॉजिजचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित भार्गव उपस्थित होते.

प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार निवारण विभाग (डीएआरपीजी), इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (एमईआयटीवाय) आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या सहकार्याने ३ व ४ सप्टेंबर, २०२४ रोजी मुंबई येथे २७वी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पीसीएमसी स्मार्ट सारथीच्या माध्यमातून नागरिकांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून. प्रशासनामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर केल्यामुळे महापालिकेला राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात येणार आहे.

### लोकाभिमुख कामकाजासाठी पुरस्कार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लोकाभिमुख कामकाजासाठी महापालिकेला या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महापालिकेच्या वतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून अनेक लोकोपयोगी प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये नागरिकांना ऑनलाईन सेवा सुविधा उपलब्ध करून देणारे पीसीएमसी स्मार्ट सारथी मोबाईल ॲप्लिकेशन, दोन वर्षांमध्ये मिळकत कर संकलनामध्ये ५१% वाढ करणारा प्रॉपर्टी टॅक्स इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम आणि आकडेवारीवर आधारित निर्णय घेण्यासाठी राबविण्यात येणारा सिटीझन हब फॉर डेटा अँड कम्युनिकेशन(सीएचडीसी) या प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे नागरिकांना सेवासुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यक्षमता वाढली आहे. तसेच कर संकलनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.




# वारीच्या प्रशासकीय नियोजनाचे फलित

**गणेशोत्सव तोंडावर आला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव आणि त्यानिमित्ताने होणाऱ्या गर्दीचे नियोजन हे नेहमीच प्रशासनापुढे मोठे आव्हान असते. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवापेक्षा कितीतरी अधिक गर्दी लोटते, अशा वारीचे नियोजन मार्गदर्शक ठरू शकते. आषाढी वारी झाली की वारीमार्गावर अस्वच्छता, पाठोपाठ साथरोग हे चित्र गेल्या काही वर्षांत बदलू लागले आहे.**

प्रत्येक टप्प्याचे अचूक नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणी यातून यंदाची वारी यशस्वी कशी करण्यात आली, याविषयी...पंढरपूर वारीला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. अनेक संतांच्या पालख्यांसह लाखो वारकरी विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरीची वाट धरत असतात. पंढरीत आषाढी एकादशीला लाखो वारकऱ्यांची मांदियाळी पाहायला मिळते. वारी सरल्यानंतर कृतकृत्य होऊन वारकरी परततात, ते पुन्हा येण्यासाठीच. यंदाच्या वारीने तब्बल १७ लाख भाविक आणि वारकरी असा उच्चांक गाठला. वारीचे नियोजन करताना समोर उभी ठाकणारी असंख्य आव्हाने जिल्हा प्रशासनाने लीलया पेलली, यासाठी अनेकांचा हातभारही लागला.काही वर्षांपूर्वीपर्यंत पंढरपूरच्या वारीनंतर पवित्र चंद्रभागा मोठ्या प्रमाणावर दूषित होऊन सर्वत्र अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरत असे. चंद्रभागेच्या वाळवंटावर पावलागणिक



अक्षरशः मैला तुडवत जावे लागत असे. कॉलरासारख्या साथ रोगांचा फैलाव होई. गेल्या दहा वर्षांत या परिस्थितीत सुधारणा झाली. त्यात सोलापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांनी आपत्ती व्यवस्थापन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करत चंद्रभागेच्या काठावर विनावापर पडून असलेल्या ६५ एकर जमिनीचा उपयोग करून वारकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या. हा प्रयोग यशस्वी ठरल्यानंतर जिल्हाधिकारी या नात्याने या सोयीसुविधांत आणखी भर घालणे हे कर्तव्य होते. गडचिरोलीसारख्या नक्षली भागातून जिल्हाधिकारी म्हणून सोलापुरात रुजू झाल्यानंतरच्या या पहिल्याच वर्षात स्थानिक दुष्काळ निवारण आणि लोकसभा निवडणुकीचे नियोजन यशस्वी केल्यानंतर पंढरपूरच्या आषाढी वारीचे मोठे नियोजन यशस्वी करण्याचे आव्हान होते. यात अधिक लोकांशी संबंध येणार होता, त्यामुळे हे काम काहीसे कठीणही होते. परंतु प्रशासकीय कौशल्ये, कठोर परिश्रम, नेतृत्व गुण, सर्वांना सोबत घेऊन काम आखण्याची हातोटी या बळावर पंढरपूरची वारी केवळ यशस्वीच झाली नाही, तर यंदा त्यातून नवीन मानदंड तयार झाला. पंढरपूरच्या वारीतील स्वच्छतेचे कौतुक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही केले. पंढरपूरची वारी यशस्वी करण्यासाठी साधारणतः दोन महिने आधीपासून नियोजन करण्यात आले. सोलापूर जिल्ह्यात पालख्यांचे आगमन झाल्यापासून वारी सरेपर्यंत दर्शन, निवास, वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता इतर सोयी-सुविधांमध्ये कोठेही गडबड-गोंधळ होणार नाही, मुख्य म्हणजे अस्वच्छता होणार नाही, दुर्गंधी पसरणार नाही, प्रदूषणात भर पडणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घेतली गेली. तिरुपतीच्या धर्तीवर दर्शन मंडप व टोकन दर्शन व्यवस्था राबवण्यासाठी प्रशासनाने सादर केलेल्या शंभर कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री शिंदे यांनी मंजुरी दिली होती. वारीचे नियोजन करताना काही कठोर उपायही योजले गेले. दर्शन रांगेत घुसखोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. दर्शन रांगेत दुहेरी कठडे उभारल्यामुळे घुसखोरीला वाव मिळाला नाही. रांगेत चार ठिकाणी विसावा केंद्रे उभारली होती. त्यामुळे भाविकांना थकवा आल्यास ते या विसावा केंद्रांत आराम करत. ही संकल्पना भाविकांसाठी खूपच लाभदायी ठरली.एरव्ही, विठ्ठल मंदिरात होणाऱ्या व्हीआयपी दर्शनामुळे वारकऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. ही व्हीआयपी दर्शन पद्धतच यंदा बंद करण्यात आली, त्यामुळे भाविकांसाठी दर्शन सुसह्य झाले.कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घेणे, ड्रोन कॅमेरे व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून नजर ठेवणे तसेच चंद्रभागा नदीमध्ये कोणतीही समस्या उद्भवू नये यासाठी प्रयत्न करणे, या दृष्टिकोनातून नियोजनबद्ध काम करण्यात आले

## प्रासंगिक »

### जोडे, खेटरे

***पुतळा पडल्यापासून राज्यातील राजकारण्यांच्या प्रतिभा आणि प्रतिमेचा दक्षिणेकडे सुरू झालेला कल्पनाविस्तार थांबण्याची काही चिन्हे दिसत नाहीत.***

पुतळा जमीनदोस्त झाल्याने या आपल्या राजकारण्यांची कल्पनाशक्ती ऊर्ध्व दिशेऐवजी अधरमुखीच झाली. कोण म्हणाले वाऱ्याच्या झुळकेने हा पुतळा पडला. कोणी जगात दर्यावर्दी गुणांसाठी ओळखल्या जाणाऱ्या नौदलास बोल लावले. कोणास आपले तारुण्य आठवून ते घरात घुसून मारण्याची भाषा करू लागले. कोणास त्यात काही शकुन दिसला आणि अधिक चांगले काही होण्यासाठी हे वाईट झाले असे वाटले. कोणी पुतळ्याची उंची १०० फुटी करण्याची भाषा करू लागला तर कोणास पुतळा पोकळ असल्याचा साक्षात्कार झाला. वास्तविक असा काही दुर्दैवी अपघात झालात्यातही; बुभुक्षित रानटी श्वापदास अचानक समोर लुसलुशीत मांसगोळ्याचे भक्ष्य आल्यावर जे वाटत असावे तशा आपल्या राजकारण्यांच्या समकक्ष भावना वाहिन्यांचे कॅमेरे पाहिल्यावर उद्दीपित होत असाव्यात.

अफगाणिस्तानातील तालिबान सरकारने मुली आणि स्त्रिया आता रस्त्यावर जवळपास दिसणारच नाहीत, असे कायदे केले आहेत. २१ ऑगस्ट रोजी ११४ पानांची एक पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली असून त्यात यासंदर्भात एकूण ३५ अनुच्छेद आहेत.

# चला, मूक अफगाण स्त्रियांचा आवाज बनूया

अफगाणिस्तानचे सर्वोच्च नेते मुल्ला हैबतुल्लाह अखुंडझादा यांनी या पुस्तिकेला मंजुरी दिली आहे. त्यानुसार स्त्रियांना रस्त्यावर जोरात बोलण्यास मनाई आहे. घराच्या बाहेर पडताना त्यांना चेहऱ्यासह सगळं शरीर झाकून घ्यावं लागेल. त्यांना गाणीही म्हणता येणार नाहीत. मुलींना सहावीपर्यंत शिक्षण घेता येईल, असा निर्णय आधीच घेण्यात आला आहे. पण त्यापलीकडे त्यांच्यासाठी बाहेरचं जग हा प्रकारच नाही. २००१ ते २०२१ या कालावधीत अफगाण स्त्रियांनी मिळवलेलं स्वातंत्र्य तालिबानच्या दुसऱ्या सरकारने संपवलं आहे. अफगाण स्त्रिया मात्र अशा स्वरूपाच्या बंधनाच्या विरोधात आहेत. त्यांनी तालिबान सरकारच्या 'स्त्रियांविरोधी धोरणा'च्या विरोधात व्हिडीओ तयार करून ते समाजमाध्यमांवर टाकले आहेत आणि ते व्हायरल झाले आहेत. अर्थात ओळख जाहीर होणार नाही याची या व्हिडीओंमध्ये विशेष काळजी घेण्यात



आली आहे.या स्त्रीविरोधी कायद्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. संयुक्त राष्ट्र (यूएन) आणि स्त्रियांच्या तसेच मानवाधिकारांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या विविध संघटनांनी त्यांचा निषेध केला आहे. २७ ऑगस्टला मानवाधिकार प्रश्नावरच्या संयुक्त राष्ट्राच्या उच्चायुक्तांनी अफगाण सरकारने हे कायदे तात्काळ मागे घेतले पाहिजेत, जागतिक समुदायाला ते मान्य नाहीत, असे म्हटले आहे. तालिबानने १५ ऑगस्ट २०२१ रोजी अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला, याला आता तीन वर्षे झाली आहेत. अफगाण स्त्रियांचे वेगवेगळे अधिकार तालिबानने काढून घेतले आहेत. तालिबान २.० च्या आधी अफगाण स्त्रिया वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करत. काबूल येथे अफगाण स्त्रियांच्या एका कार्यशाळेत त्यांच्यातला उत्साह आणि देशाला दहशतवादापासून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याची त्यांची इच्छा मला जवळून पाहायला मिळाली होती. अश्रफ घनी राष्ट्राध्यक्ष असताना त्यांच्या पत्नीची (फर्स्ट लेडी) भेट घेतली तेव्हा २२ वर्षांच्या मशाल नावाच्या त्यांच्या सचिव मुलीची भेट झाली होती. अशा अनेक तरुण मुली परदेशात शिकून परतल्या होत्या. देशासाठी काहीतरी करायची त्यांची इच्छा होती. त्यांच्यातल्या बहुतेक जणी आता अफगाणिस्तानच्या बाहेर निघून गेल्या आहेत. बाहेर जायची इच्छा असलेल्या बऱ्याच जणी अफगाणिस्तानात अडकून पडल्या आहेत. त्याच या क्रूर राजवटीच्या विरोधात बोलत आहेत.अखुंडझादा यांनी 'व्यभिचारा'च्या गुन्ह्यासाठी स्त्रियांना दगडाने ठेचून मृत्युदंड देण्याची मार्च महिन्यात घोषणा केली होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिवाजी महाराज आमचे दैवत आहेत!

## » जोडे मारो आंदोलनावरून विरोधकांवर मुख्यमंत्र्यांची टीका

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राज्यात सध्या लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरले जात आहेत. दोन कोटीहून अधिक महिलांना या योजनेसाठी पात्र ठरवण्यात आलं आहे. मात्र, या योजनेच्या अर्जप्रक्रियेदरम्यान गैरप्रकार झाल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. सातार्‍यात एका व्यक्तीने ३० जणांच्या आधार कार्डचा गैरवापर करून तब्बल ३० अर्ज भरले आहेत. तर पनवेलमध्ये व्यक्तीने एका महिलेचा वेगवेगळ्या पोशाखात फोटो वापरून अर्ज भरला आहे. दरम्यानन, या घटनानंतर आता गैरप्रकार करणार्‍यांना थेट मुख्यमंत्र्यांनी इशारा दिला आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी त्यांना या घटनांबाबत विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, लाडकी बहीण योजना गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी असून यात गैरप्रकार करणार्‍यांना तुरुंगात टाकलं जाईल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.या योजनेत कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. सातार्‍याच्या जिल्हाधिकार्‍यांशी मी चर्चा केली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी आहे. यात कोणीही भ्रष्टाचार केला, तर तो खपवून घेतला जाणार नाही. आरोपींना थेट तुरुंगात टाकलं जाईल", असा इशारा त्यांनी दिली. शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहेत. मालवणमध्ये झालेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. शिवरायांचा आदर्श ठेवून आपण राज्यकारभार करत असतो. त्यामुळे यावरून राजकारण करणं दुर्दैवी आहे. पण आपण बघितलं की नुकताच जोडे मारो आंदोलन झालं, यावेळी कुणी कुणाचे जोडे हातात घेतले होते, ते कळलंच नाही, घरात बसलेले लोकही रस्त्यावर आले आणि त्यांनी रस्त्यावर येऊन दुसर्‍यांचे जोडे हातात घेतले. एकवेळ कार्यकर्त्यांनी रस्त्यावर येऊन जोडे मारले, तर समजू शकतो, पण मोठे नेत्यांनी रस्त्यावर येऊन जोडे मारले, हे दुर्दैवी चित्र महाराष्ट्राने बघितलं", अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.पुढे बोलताना त्यांनी एसटी कर्मचार्‍यांच्या संपाबाबतही भाष्य केलं."एसटी कर्मचार्‍यांच्या मागण्यांबाबत चर्चा सुरू आहे. मागे यासंदर्भात एक बैठक झाली होती. उद्याही बैठक आयोजित करण्यात आली आहे. सध्या गणपतीचे दिवस आहेत. त्यामुळे माझी एसटी कर्मचार्‍यांना विनंती आहे, की त्यांनी नागरिकांना वेठीस धरू नये. एसटी कर्मचार्‍यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. कुणीही संपावर जाऊ नये", असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं. दरम्यान, संजय राऊत यांनी सकाळी माध्यमांशी बोलताना मालवण येथील पुतळ्याचे शिल्पकार वर्षा बंगल्यावर असल्याची टीका केली होती. त्या टीकेलाही मुख्यमंत्र्यांनी प्रत्युत्तर दिलं. "हिंमत असेल तर संजय राऊतांनी त्याला शोधायला वर्षा बंगल्यावर यावं", असे ते म्हणाले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी त्यांना या घटनांबाबत विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, लाडकी बहीण योजना गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी असून यात गैरप्रकार करणार्‍यांना तुरुंगात टाकलं जाईल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.या योजनेत कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. सातार्‍याच्या जिल्हाधिकार्‍यांशी मी चर्चा केली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी आहे. यात कोणीही भ्रष्टाचार केला, तर तो खपवून घेतला जाणार नाही. आरोपींना थेट तुरुंगात टाकलं जाईल", असा इशारा त्यांनी दिली.शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहेत. मालवणमध्ये झालेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. शिवरायांचा आदर्श ठेवून आपण राज्यकारभार करत असतो. त्यामुळे यावरून राजकारण करणं दुर्दैवी आहे. पण आपण बघितलं की नुकताच जोडे मारो आंदोलन झालं, यावेळी कुणी कुणाचे जोडे हातात घेतले होते, ते कळलंच नाही, घरात बसलेले लोकही रस्त्यावर आले आणि त्यांनी रस्त्यावर येऊन दुसर्‍यांचे जोडे हातात घेतले.

### संजय राऊतांना दिलं प्रत्युत्तर...

एकवेळ कार्यकर्त्यांनी रस्त्यावर येऊन जोडे मारले, तर समजू शकतो, पण मोठे नेत्यांनी रस्त्यावर येऊन जोडे मारले, हे दुर्दैवी चित्र महाराष्ट्राने बघितलं", अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.पुढे बोलताना त्यांनी एसटी कर्मचार्‍यांच्या संपाबाबतही भाष्य केलं. "एसटी कर्मचार्‍यांच्या मागण्यांबाबत चर्चा सुरू आहे. मागे यासंदर्भात एक बैठक झाली होती. उद्याही बैठक आयोजित करण्यात आली आहे. सध्या गणपतीचे दिवस आहेत.

# एसटी कर्मचार्‍याच्या संपात ठाकरेंची माणसं

## » ठाकरे यांची माणसं असल्याचा आरोप सदावर्ते यांनी केला

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**प्रलंबित मागण्या मान्य न झाल्याचं म्हणत एसटी कामगार संयुक्त कृती समितीने आजपासून (३ सप्टेंबर) बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यानुसार राज्यातील विविध आगारांमध्ये कामबंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. या मुद्द्यावरून आता राजकारणदेखील तापण्याची शक्यता आहे.**

दरम्यान, या एसटी कर्मचार्‍यांच्या संपात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांची माणसं असल्याचा आरोप वकील गुणरत्न सदावर्ते यांनी केला आहे. टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली."जे लोक आंदोलन करत आहेत, ते शरद पवार, उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीशी संबंधित आहेत. काही बोटावर मोजण्याइतके आणि एसटीमधून निलंबित करण्यात आलेली लोक आंदोलन करत आहेत. नोकरीवर असताना प्रदीर्घ काळ रजा घेऊन मजा मारणारी ही लोक आहेत", अशी प्रतिक्रिया गुणरत्न सदावर्ते यांनी दिली आहे.ज्या कृती समितीने या आंदोलनाची हाक दिली आहे, ती





कृती समिती नाही, कीडे समिती आहे. ही लोक पाच टक्के मलाई खाणारे लोक आहेत. यांनी लिहून देताना, धरणे आंदोलन करत असल्याचं लिहून दिलं आहे. मात्र, एसटीतील कष्टकर्‍यांना संप करण्यास सांगण्यात आलं आहे. एसटी कर्मचार्‍यांच्या नोकरीवर उठलेली ही बांडगुळं आहेत", अशी टीकाही सदावर्ते यांनी केली. पुढे बोलताना, "आम्ही आंदोलन केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने सातव्या वेतन आयोगाबाबत विचार करण्यास सांगितलं होतं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दसर्‍या मेळाव्यालाच त्याची कार्यवाही पूर्ण केली होती. मात्र, कृती समितीने अडचणी आणून ती होऊ दिली नाही. कारण त्यांना बीओटी तत्वावरील करारातील पाच टक्के मलाई खायची होती",दरम्यान, सुप्रिया सुळे यांच्या विधानावरूनही त्यांनी शरद पवार यांना लक्ष्य केलं.

### बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा

"सुप्रिया सुळे म्हणतात, की आम्ही एसटी गावावापर्यंत पोहोचवू, पण जेव्हा १२४ एसटी कर्मचार्‍यांच्या आत्महत्या झाल्या, तेव्हा सुप्रिया सुळे कुठं होत्या? तेव्हा त्या संसदेत का बोलल्या नाहीत? तेव्हा शरद पवार शांत का होते? मुळात ही जबाबदारी न स्वीकारणारी आणि एसटी कर्मचार्‍यांच्या नोकर्‍या धोक्यात आणणारी माणसं आहेत. सध्या जे आंदोलन सुरू आहे, ते राजकीय दृष्ट्या प्रेरित आहे. यामध्ये महाविकास आघाडीचा हात आहे", असेही ते म्हणाले.प्रलंबित मागण्या मान्य न झाल्याचं म्हणत एसटी कामगार संयुक्त कृती समितीने आजपासून (३ सप्टेंबर) बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# मोदी ब्रुनेई देशाच्या दौऱ्यावर!

## सुलतानाकडे आहेत 7000 गाड्या, 1700 बेडरुम्सचा महाल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी पूर्व आशियातला इवलासा देश असलेल्या ब्रुनेईला भेट देणार आहेत. ब्रुनेईचे सुलतान हाजी हस्सानल बोलकिया यांच्या निमंत्रणानंतर भेट देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान आहेत. दोन दिवसांच्या या दौऱ्यात दोन्ही देशांचे द्विपक्षीय संबंध आणखी दृढ करण्यावर चर्चा होणार आहे. तसेच दोन्ही देशांच्या ४० वर्षांच्या द्विपक्षीय धोरणात्मक संबंधाच्या स्मरणार्थ कार्यक्रम घेतला जाणार आहे. ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ द्वितीय यांच्यानंतर सुलतान हाजी हस्सानल बोलकिया हे सर्वाधिक काळ गादीवर बसलेले राजे आहेत.**



सुलतान हस्सानल बोलकिया यांचा उल्लेख राजेशाही थाटात आलिशान जीवनशैली जगणाऱ्या नेत्यांमध्ये होते. प्रचंड उधळपट्टी करत त्यांनी अलिखान गाड्यांचा ताफा गोळा केला आहे. यासाठी त्यांनी पाच अब्ज डॉलर खर्च केले आहेत. ब्रुनेईच्या ऑईल अँड गॅस साठ्यांमधून सुलतान हस्सानल बोलकिया यांना उत्पन्न मिळते. त्यांची एकूण संपत्ती ३० अब्ज डॉलर इतकी आहे. सुलतान यांच्याकडे ७००० आलिशान गाड्या आहेत. यापैकी ६०० तर रोल्स रॉयस कंपनीच्या गाड्या आहेत. इतक्या गाड्या बाळगल्याबद्दल त्यांची नोंद गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे.सनने दिलेल्या बातमीनुसार, सुलतान हस्सानल बोलकिया यांच्या ताफ्यात ४५० फेरारी, ३५० बेंटली कार आहेत. यासोबतच पोर्श, लॅम्बोर्गिनी, मेयबॅक, जॅग्वॉर, बीएमडब्लू आणि मॅलारेन अशा इतर कारही असल्याची माहिती कारबझ आणि द साऊथ चायना मॉर्निंग पोस्टने दिली आहे. हस्सानल बोलकिया यांच्या ताफ्यातील बेंटली डॉमिनेटर एसयूव्ही सर्वात महागडी कार आहे. ज्याची किंमत ८० दशलक्ष डॉलर इतकी आहे. याबरोबर एक पोर्श ९११ गाडी आहे. तर सोन्याचा वर्ख लावलेली रोल्स रॉयस गाडी आहे. एका रोल्स रॉयस गाडीला सोन्याचा वर्ख लावला असून गाडीच्या छतावर एक छत्री आणि बसायला ऐसपैस जागा केली आहे. ज्यातून राजेशाही थाट दिसून येतो. सुलतान बोलकिया यांची संपत्ती फक्त गाड्यांच्या ताफ्यांपर्यंत मर्यादीत नाही. तर त्यांच्या इस्ताना नुरुल इमाम महालाचीही गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड बुकमध्ये नोंद झालेली आहे. जगातील सर्वात मोठा महाल म्हणून याला ओळखले जाते. दोन दशलक्ष स्क्वेअर फुटाचे बांधकाम असलेल्या या महालात ५ स्विमिंग पूल, १,७०० बेडरूम्स, २५७ बाथरुम आणि ११० गॅरेज आहेत. सुलतानचे स्वतःचे प्राणीसंग्रहालय आहे. ज्यामध्ये ३० बंगाली वाघ आहेत. अनेक प्रकारच्या प्रजातीचे पक्षी आहेत. त्यांच्याकडे बोईंग ७४७ विमानदेखील आहे. सुलतान हस्सानल बोलकिया यांचा उल्लेख राजेशाही थाटात आलिशान जीवनशैली जगणाऱ्या नेत्यांमध्ये होते. प्रचंड उधळपट्टी करत त्यांनी अलिखान गाड्यांचा ताफा गोळा केला आहे. यासाठी त्यांनी पाच अब्ज डॉलर खर्च केले आहेत. ब्रुनेईच्या ऑईल अँड गॅस साठ्यांमधून सुलतान हस्सानल बोलकिया यांना उत्पन्न मिळते. त्यांची एकूण संपत्ती ३० अब्ज डॉलर इतकी आहे. सुलतान यांच्याकडे ७००० आलिशान गाड्या आहेत. यापैकी ६०० तर रोल्स रॉयस कंपनीच्या गाड्या आहेत. इतक्या गाड्या बाळगल्याबद्दल त्यांची नोंद गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे.सनने दिलेल्या बातमीनुसार, सुलतान हस्सानल बोलकिया यांच्या ताफ्यात ४५० फेरारी, ३५० बेंटली कार आहेत. यासोबतच पोर्श, लॅम्बोर्गिनी, मेयबॅक, जॅग्वॉर, बीएमडब्लू आणि मॅलारेन अशा इतर कारही असल्याची माहिती कारबझ आणि द साऊथ चायना मॉर्निंग पोस्टने दिली आहे. हस्सानल बोलकिया यांच्या ताफ्यातील बेंटली डॉमिनेटर एसयूव्ही सर्वात महागडी कार आहे.

### महालात 5 स्विमिंग पूल

ज्याची किंमत ८० दशलक्ष डॉलर इतकी आहे. याबरोबर एक पोर्श ९११ गाडी आहे. तर सोन्याचा वर्ख लावलेली रोल्स रॉयस गाडी आहे. एका रोल्स रॉयस गाडीला सोन्याचा वर्ख लावला असून गाडीच्या छतावर एक छत्री आणि बसायला ऐसपैस जागा केली आहे. ज्यातून राजेशाही थाट दिसून येतो. सुलतान बोलकिया यांची संपत्ती फक्त गाड्यांच्या ताफ्यांपर्यंत मर्यादीत नाही. तर त्यांच्या इस्ताना नुरुल इमाम महालाचीही गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड बुकमध्ये नोंद झालेली आहे. जगातील सर्वात मोठा महाल म्हणून याला ओळखले जाते. दोन दशलक्ष स्क्वेअर फुटाचे बांधकाम असलेल्या या महालात ५ स्विमिंग पूल, १,७०० बेडरूम्स, २५७ बाथरुम आणि ११० गॅरेज आहेत. सुलतानचे स्वतःचे प्राणीसंग्रहालय आहे. ज्यामध्ये ३० बंगाली वाघ आहेत.

# बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास फाशी

## पश्चिम बंगाल गुन्हेगारी प्रतिबंध कायदा दुरुस्ती विधेयक

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पश्चिम बंगाल सरकारने महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसंच लैंगिक अत्याचार, शोषण आणि बलात्काराच्या घटनांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने नवं विधेयक आणलं आहे. या विधेयकातली महत्त्वाची तरतूद म्हणजे बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास आरोपीला फाशी दिली जाणार ही आहे.**



बलात्कार आणि शोषणाच्या घटनांच्या विरोधात हे विधेयकआणण्यात आलं होतं हे विधेयक ममता सरकारने मंजूर केलं आहे. विधानसभेत हे विधेयक मांडण्यात आलं जे सगळ्याच आमदारांनी एकमुखाने मान्य केलं.अपराजिता वुमन चाईल्ड बिल असं या विधेयकाचं ( पश्चिम बंगाल गुन्हेगारी प्रतिबंध कायदा दुरुस्ती विधेयक २०२४ नाव आहे. या विधेयकावर चर्चा करण्यासाठी दोन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलवण्यात आलं आहे. मागच्या महिन्यात ९ तारखेला आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय या ठिकाणी एका डॉक्टर महिलेवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. या घटनेने सगळा देश हादरला. या प्रकरणानंतर आता कायदे कठोर करण्याच्या दृष्टीने ममता सरकारने हे नवं विधेयक आणलं ज्या विधेयकाला आता मंजुरी मिळाली आहे.

### अपराजिता वुमन चाईल्ड बिल

त्यामुळे या विधेयकाचं कायद्यात रुपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.बलात्कार, सामूहिक बलात्काराच्या आरोपींना जन्मठेपेची शिक्षा देण्यात यावी. ही शिक्षा त्यांचा मृत्यू नैसर्गिकरित्या होत नाही तोपर्यंत असेल. त्याचप्रमाणे बलात्कार पीडितेचा मृत्यू झाल्यास आरोपींना फाशी दिली जाईल. बलात्कार प्रकरणाचा तपास अहवाल २१ दिवसांच्या आत आला पाहिजे अशीही तरतूद करण्यात आली आहे. जर २१ दिवसांत तपास पूर्ण झाला नाही तर तपास पूर्ण करण्यासाठी आणखी १५ दिवसांची मुदतच वाढवून मिळेल. या १५ दिवसांच्या कालावधीत जो तपास केला जाईल.

# कुटुंब आणि मित्रांसोबत गेट टुगेदर पार्टी!

परिणीती चोप्रा आणि आपचे खासदार राघव चड्ढा यांच्या लग्नाचे कार्यक्रम वेगवेगळ्या शहरात होणार आहेत. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, राघव-परिणितीच्या लग्नाचे कार्यक्रम 17 सप्टेंबर रोजी दिल्लीत अरदास आणि शब्द कीर्तन (शीख धर्माची प्रार्थना) सह सुरू होतील. यानंतर हे जोडपे लग्नासाठी उदयपूरला जाणार आहेत. यानंतर चंदीगडमध्ये रिसेप्शन पार्टी होणार आहे. चंदीगडनंतर हे कपल दिल्लीतही रिसेप्शन पार्टी देणार आहे. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, 17 सप्टेंबर रोजी दिल्लीत अरदास आणि शब्द कीर्तनानंतर गेट-टूगेदर पार्टी होणार आहे. राघव-परिणितीचे कुटुंबीय आणि जवळचे मित्र या पार्टीत सहभागी होणार आहेत. यानंतर दोघेही कुटुंबासह उदयपूरला जाणार आहेत. लग्नाच्या सर्व फंक्शन्समध्ये जोडप्याच्या कपड्यांप्रमाणेच पेस्टल आणि पर्ल व्हाइट थीमची सजावट पाहायला मिळेल. परिणीती आणि राघव यांना ही रंग आणि सजावटीची थीम आवडली आहे. लग्नातही हे जोडपे सारख्याच रंगाचे को-ऑर्डिनेटेड कपडे परिधान करताना दिसणार आहेत. रिपोर्टनुसार, परिणीतीने जवळपास सर्व फंक्शन्समध्ये कोणते कपडे घालायचे हे ठरवले आहे, तर राघवचे पोशाख अजून ठरलेले नाहीत. पाहुण्यांची यादीही अंतिम करण्यात आली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, राज्यसभा सदस्य कपिल सिब्बल, आपचे खासदार संजय सिंह आणि काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते अभिषेक मनू सिंघवी यांनाही या लग्नाचे निमंत्रण देण्यात आले आहे. या लग्नाला बॉलिवूड इंडस्ट्रीतील दिग्गज कलाकारही हजेरी लावणार आहेत.



# प्राजक्ता कोळीचा साखरपुडा

मिसमॅच्ड फेम अभिनेत्री प्राजक्ता कोळीने तिचा दीर्घकाळापासूनचा बॉयफ्रेंड वृशांक खनालसोबत एंगेजमेंट केली आहे. या जोडप्याने रविवारी एक फोटो पोस्ट करून चाहत्यांसोबत ही आनंदाची बातमी शेअर केली. प्राजक्ताने तिच्या इंस्टाग्राम पोस्टवर लिहिले- 'वृशांक आता माझा बॉयफ्रेंड नाही'. शेअर केलेल्या फोटोमध्ये प्राजक्ता आणि वृषांक त्यांच्या एंगेजमेंट रिंग्ज फ्लॉंट करताना दिसत आहेत. प्राजक्ता आणि वृशांकच्या या सोशल मीडिया पोस्टवर चाहते आणि सेलेब्स तीव्र प्रतिक्रिया देत आहेत. 'नेव्हर हॅव आय एव्हर' अभिनेत्री मैत्रेयी रामकृष्णन हिने कमेंटमध्ये लिहिले - अभिनंदन. अनिल कपूरने लिहिले- 'तुम्हा दोघांचे खूप अभिनंदन, जुग जुग जियो.' प्राजक्ताच्या ऑनस्क्रीन भावाची भूमिका करणाऱ्या वरुण धवननेही मनापासून प्रतिक्रिया दिली. याशिवाय सुनील शेट्टी, भूमी पेडणेकर, अरमान मलिक, बरखा सिंग, भारती सिंग आणि गौहर खान यांच्यासह अनेक सेलिब्रिटींनी या जोडप्याला त्यांच्या लग्नासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# रुबिना दिलायक होणार आहे आई

अभिनेत्री रुबिना दिलायक आई होणार आहे. अलिकडेच तिने तिचा पती आणि अभिनेता अभिनव शुक्लासोबतचा एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली. सध्या रुबिना आणि अभिनव शुक्ला अमेरिकेत सुट्टी घालवत आहेत. या फोटोत रुबिनाचा बेबी बंपही स्पष्ट दिसत आहे. जॉइंट पोस्ट शेअर करताना अभिनव आणि रुबिनाने लिहिले - आम्ही डेटिंग करायला सुरुवात केली तेव्हा आम्ही एकमेकांना वचन दिले होते की संपूर्ण जग फिरू. आम्ही लग्न केले आणि आता आम्ही एक कुटुंब म्हणून आमचा नवीन प्रवास सुरू करत आहोत. लवकरच आमच्यासोबत एक छोटा प्रवासीही असेल. या पोस्टवर अभिनेत्री सृती झा हिने या जोडप्याचे अभिनंदन केले आहे. सिंपल कौल यांनी पोस्टवर लिहिले आहे- वाढदिवसाच्या शुभेच्छा! ही खूप चांगली बातमी आहे. तुम्हा दोघांना खूप खूप प्रेम! सोशल मीडिया यूजर्सनीही या पोस्टवर जोडप्याला शुभेच्छा दिल्या आहेत. एका यूजरने लिहिले- शेवटी तुम्ही प्रेग्नेंसीची अधिकृत घोषणा केली आहे. तुम्हा दोघांचेही खूप खूप अभिनंदन! रुबिना 4 महिन्यांची गरोदर आहे आणि तिच्या बाळाची पुढील वर्षी प्रसूती होऊ शकते. अभिनव शुक्लाने 2018 मध्ये शिमला येथे त्याची दीर्घकाळाची मैत्रीण रुबिनासोबत लग्न केले. अभिनेत्री रुबिना दिलायक आई होणार आहे. अलिकडेच तिने तिचा पती आणि अभिनेता अभिनव शुक्लासोबतचा एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट



# माधुरी साकारणार सरोज खान यांची भूमिका!



दिवंगत कोरिओग्राफर सरोज खान यांच्या जीवनावर बायोपिक बनवला जाणार आहे. निर्माता भूषण कुमार यांनी नुकतेच याला दुजोरा दिला आहे. आता या मालिकेतील मुख्य अभिनेत्रीबाबत एक अपडेट समोर आले आहे. माधुरी दीक्षितला कोरिओग्राफर सरोज खानच्या भूमिकेत कास्ट करण्याचा विचार निर्माते करत असल्याच्या बातम्या आहेत. कोरिओग्राफर सरोज खान यांच्या मुलीनेही बायोपिकमध्ये माधुरी दीक्षितच्या कास्टिंगबद्दल म्हटले आहे. माधुरी दीक्षितने या बायोपिकचा भाग व्हावे असे त्यांना वाटते. बायोपिकबाबतही त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. सरोज खानच्या बायोपिकसाठी अद्याप कोणत्याही अभिनेत्रीचे नाव फायनल झालेले नाही. मात्र, निर्माते माधुरी दीक्षितला कास्ट करण्याचा विचार करत आहेत. सरोज जींच्या आयुष्यातील वेगवेगळे टप्पे दाखवण्यासाठी निर्माते वेगवेगळ्या वयोगटातील कलाकारांच्या शोधात आहेत. सरोज खानवर बनत असलेला हा बायोपिक सध्या लेखनाच्या टप्प्यात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बायोपिकमध्ये बरेच काही समाविष्ट आहे, सरोज खानचे आयुष्य अनेक चढ-उतारांनी भरलेले आहे. अशा परिस्थितीत बायोपिकच्या माध्यमातून ते पडद्यावर दाखवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अशा परिस्थितीत कथेचा कोणता अँगल दाखवायचा हे निर्माते अजूनही ठरवत आहेत. मीडियाशी संबंधित आणखी एका सूत्राने सांगितले- 6 महिन्यांपूर्वी माधुरी दीक्षितला लीड म्हणून कास्ट करण्याची चर्चा होती. तिच्याशी संपर्क करण्यात आला. या व्यक्तिरेखेसाठी ती योग्य निवड आहे.

# शहजादने पाकिस्तानची उडवली खिल्ली!

## बांगलादेशने मालिकेत 2-0 ऐतिहासिक विजय नोंदवला

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**बांगलादेशने मंगळवारी रावळपिंडीत झालेल्या दुसऱ्या कसोटीत पाकिस्तानचा ६ विकेट्सनी धुव्वा उडवला. यासह बांगलादेशने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० ऐतिहासिक विजय नोंदवला. घरच्या मैदानावर खेळताना झालेल्या या लाजिरवाण्या पराभवानंतर पाकिस्तान संघावर जोरदार टीका होत आहे. सोशल मीडिया विविध प्रकारच्या मीम्स शेअर चाहते खेळाडू आणि पीसीबीसह पंतप्रधानांनाही ट्रोल करत आहेत. दरम्यान, पाकिस्तानचा माजी खेळाडू अहमद शहजादने आपल्या संघाला चांगलेच फटकारले आहे.**




अहमद शहजादने सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये तो म्हणाला, “बांगलादेशने पाकिस्तानला त्यांच्याच घरच्या मैदानावर व्हाईटवॉश केले. अरे भाई, तुम्हाला काय येतच नाही. अशाने तुमच्याकडून काही होणारच नाही. त्यामुळे आता तुम्हाला काय म्हणायचं. बांगलादेशने त्यांचा सरावही इथे येऊन केला. कारण त्यांच्या देशातील परिस्थितीही चांगली नव्हती.”शहजाद पुढे म्हणतो, “बांगलादेशने काय क्रिकेट खेळले. त्यांनी कशा प्रकारे फलंदाजी आणि गोलंदाजी केली. त्यांच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्यानंतर त्यांच्या फलंदाजांनी दाखवून दिले की कसोटी क्रिकेट कसे खेळायचे असते. तुम्ही घरचा संघ खेळपट्टी अशी नको तशी असावी, असे म्हणत असताना त्याच खेळपट्टीवर बांगलादेशचे खेळाडू फलंदाजी करत होते, तेव्हा ही खेळपट्टी सपाट असल्यासारखी वाटत होती.”पाकिस्तानच्या कसोटी इतिहासात प्रथमच बांगलादेशकडून कसोटी मालिकेत पराभव पत्करावा लागला आहे. या मालिकेत त्यांनी प्रथमच कसोटीत पराभवाचा विक्रमही केला. पाकिस्तान क्रिकेटसाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पाकिस्तानला खराब फिल्डिंग आणि साधारण फलंदाजी या बाबींचा मोठा फटका बसला. आतापर्यंत मोठे संघ पाकिस्तानला त्यांच्या घरच्या मैदानावर पराभूत करायचे, पण आज बांगलादेशसारख्या संघानेही पाकिस्तानचा पराभव केला आहे. बांगलादेशसारखा छोटा संघ क्रिकेटच्या या फॉरमॅटवर जास्त लक्ष केंद्रित करत नाही, पण तरीही त्यांनी पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेत वर्चस्व राखले आणि मालिका २-० अशी जिंकली.अहमद शहजादने सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये तो म्हणाला, “बांगलादेशने पाकिस्तानला त्यांच्याच घरच्या मैदानावर व्हाईटवॉश केले. अरे भाई, तुम्हाला काय येतच नाही. अशाने तुमच्याकडून काही होणारच नाही. त्यामुळे आता तुम्हाला काय म्हणायचं. बांगलादेशने त्यांचा सरावही इथे येऊन केला. कारण त्यांच्या देशातील परिस्थितीही चांगली नव्हती.”शहजाद पुढे म्हणतो, “बांगलादेशने काय क्रिकेट खेळले. त्यांनी कशा प्रकारे फलंदाजी आणि गोलंदाजी केली. त्यांच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्यानंतर त्यांच्या फलंदाजांनी दाखवून दिले की कसोटी क्रिकेट कसे खेळायचे असते. तुम्ही घरचा संघ खेळपट्टी अशी नको तशी असावी, असे म्हणत असताना त्याच खेळपट्टीवर बांगलादेशचे खेळाडू फलंदाजी करत होते, तेव्हा ही खेळपट्टी सपाट असल्यासारखी वाटत होती.”पाकिस्तानच्या कसोटी इतिहासात प्रथमच बांगलादेशकडून कसोटी मालिकेत पराभव पत्करावा लागला आहे. या मालिकेत त्यांनी प्रथमच कसोटीत पराभवाचा विक्रमही केला. पाकिस्तान क्रिकेटसाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पाकिस्तानला खराब फिल्डिंग आणि साधारण फलंदाजी या बाबींचा मोठा फटका बसला. आतापर्यंत मोठे संघ पाकिस्तानला त्यांच्या घरच्या मैदानावर पराभूत करायचे, पण आज बांगलादेशसारख्या संघानेही पाकिस्तानचा पराभव केला आहे. बांगलादेशसारखा छोटा संघ क्रिकेटच्या या फॉरमॅटवर जास्त लक्ष केंद्रित करत नाही, पण तरीही त्यांनी पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेत वर्चस्व राखले आणि मालिका २-० अशी जिंकली.बांगलादेशने मंगळवारी रावळपिंडीत झालेल्या दुसऱ्या कसोटीत पाकिस्तानचा ६ विकेट्सनी धुव्वा उडवला. यासह बांगलादेशने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० ऐतिहासिक विजय नोंदवला. घरच्या मैदानावर खेळताना झालेल्या या लाजिरवाण्या पराभवानंतर पाकिस्तान संघावर जोरदार टीका होत आहे.

### बांगलादेश संघाने घडवला इतिहास

अहमद शहजादने सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये तो म्हणाला, “बांगलादेशने पाकिस्तानला त्यांच्याच घरच्या मैदानावर व्हाईटवॉश केले. अरे भाई, तुम्हाला काय येतच नाही. अशाने तुमच्याकडून काही होणारच नाही. त्यामुळे आता तुम्हाला काय म्हणायचं. बांगलादेशने त्यांचा सरावही इथे येऊन केला. कारण त्यांच्या देशातील परिस्थितीही चांगली नव्हती.”शहजाद पुढे म्हणतो, “बांगलादेशने काय क्रिकेट खेळले. त्यांनी कशा प्रकारे फलंदाजी आणि गोलंदाजी केली. त्यांच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्यानंतर त्यांच्या फलंदाजांनी दाखवून दिले.

# बाबर आझमने कसोटीमधून घेतली निवृत्ती?

## कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसरा सामना रावळपिंडी येथे खेळवला गेला. या सामन्यात बांगलादेशने ६ विकेट्सने विजय मिळवत पाकिस्तानचा दारूण पराभव केला. या विजयासह बांगलादेशने ही कसोटी मालिका २-० च्या फरकाने एकतर्फी जिंकली आहे. घरच्या मैदानावर झालेल्या या पराभवाने पाकिस्तानला मोठ्या टीकेला सामोरे जावे लागत आहे.**




दरम्यान बाबर आझमने कसोटीमधून निवृत्ती जाहीर केल्याची एक पोस्ट व्हायरल झाली आहे.बाबर आझमच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची पोस्ट खूप वेगाने व्हायरल होत आहे. खरं तर बाबर आझमची कसोटी क्रिकेटमध्ये खराब कामगिरी सुरूच आहे. बांगलादेशविरुद्धच्या दोन्ही सामन्यांमध्ये बाबरने आपल्या फलंदाजीने चाहत्यांना आणि संघाला निराश केले आहे. त्यानंतर आता त्यांचे निवृत्तीची पोस्ट समोर येत आहे. पण ही निवृत्तीची पोस्ट

### कसोटीत बाबरची बॅट शांत

बाबर आझमची बॅट कसोटी क्रिकेटमध्ये तळपताना पाहायला मिळालेली नाही. बाबरने गेल्या १६ डावांमध्ये एकही अर्धशतक झळकावलेले नाही. बाबरने बांगलादेशविरुद्धही निराशाजनक फलंदाजी केली.तर दुसऱ्या कसोटीत पहिल्या डावात ३१ धावा केल्यानंतर दुसऱ्या डावात केवळ ११ धावा करून तो बाद झाला. अशा कामगिरीनंतर चाहत्यांनी त्याच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीचे एक पत्र पोस्ट केले.

खोटी आहे.बाबर आझमच्या पॅरोडी अकाऊंटवरून सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करण्यात आली होती. ज्यामध्ये बाबर आझमची कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केल्याचे म्हटले होते. काही वेळातच ही पोस्ट सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली. ही अफवा खोटी असून बाबरने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केलेली नाही. मात्र, या पोस्टमुळे पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमने कसोटी क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला आहे, अशी चर्चा रंगली आहे. बांगलादेश-पाकिस्तान यांच्यातील कसोटी सामना सुरू असतानाच ही पोस्ट व्हायरल झाली होती.